# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १९.०७.२०२६

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि.१८/०७/२०२६ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५१३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५५६०५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१८/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण २५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २८०००/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणारे अंतर्गत दि. १८/०७/२०२६ रोजी जुगार कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन एकुण २२२५४०/—रू. किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीता विरूध्द जुगार कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.